अर्जाचा नमुना :-

सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी कंत्राटी चौकशी अधिकारी म्हणून नियुक्तीकरीता सादर करावयाचा विहीत नमुन्यात अर्ज :-

1) अधिकाऱ्याचे नाव :-
2) जन्म दिनांक :-
3) सेवानिवृत्तीचा दिनांक :-
4) सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद :-
5) ज्या विभागातून सेवानिवृत्त झाले तो विभाग :-
6) यापूर्वी चौकशी अधिकारी म्हणून काम केले आहे काय?:-
7) काम केले असल्यास, त्याचा तपशील :-
8) सेवेत असताना शिक्षा झालेली आहे काय? :-
9) असल्यास, त्याचा तपशील :-

नाव/स्वाक्षरी
कायमचा पत्ता
दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक

**अटी व शर्ती :-**

अ) **(I)** कंत्राटी चौकशी अधिकारी म्हणून नेमावयाच्या अधिकाऱ्यांनी ते ज्या प्रकरणी विभागीय चौकशी करणार आहेत त्या चौकशी प्रकरणामध्ये त्यांचा कोणत्याही प्रकारे अपचारी वा प्रकरणाशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध आलेला नाही व त्या चौकशी प्रकरणामध्ये कोणत्याही प्रकारचे हितसंबंध नाहीत असे शपथपत्र देणे बंधनकारक राहील.

**(II)** सदर कंत्राटी चौकशी अधिकारी त्यास प्राप्त झालेल्या विभागीय चौकशी प्रकरणामधील कागदपत्र, माहिती अथवा सांख्यिकीय माहिती याचा वापर फक्त विभागीय चौकशी प्रकरणाचा अहवाल तयार करण्यासाठी करील व सर्व माहिती गोपनीय ठेवील.

ब) कंत्राटी चौकशी अधिकारी हे चौकशीचे कामकाज संपल्यानंतर उक्त चौकशी प्रकरणांची सर्व कागदपत्रे/अभिलेख शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांच्याकडे चौकशी अहवालासह परत सोपवतील.सदरील कंत्राटी चौकशी अधिकारी 4 महिन्याच्या आत आपला चौकशी अहवाल शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांच्याकडे सादर करील. अपवादात्मक प्रकरणी योग्य ती कारणमिमांसा नमूद करुन चौकशी अधिकारी यांनी शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांच्याकडून दोन महिन्यांची मुदतवाढ घ्यावी.

क) कंत्राटी चौकशी अधिकारी यांनी चौकशी प्रकरणाचा प्राधान्यक्रम न्यायालयीन प्रकरणे, सेवानिवृत्त अधिकाऱ्याची प्रकरणे 1 वर्षाच्य आत सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांची प्रकरणे व सर्वसाधारण प्रकरणे असा ठेवून त्यानुसार प्रकरणे निकाली काढावीत.

ड) कंत्राटी चौकशी अधिकारी यांना खालीलप्रमाणे मानधन अनुज्ञेय राहील :-

एका विभागीय चौकशी प्रकरणामध्ये 1 अपचारी असल्यास रुपये 18,000/- व अपचाऱ्यांची संख्या वाढल्यास प्रती अपचारी रुपये 3000/- याप्रमाणे कमाल रुपये 30,000/- इतके रक्कम अनुज्ञेय राहील.

वरील संपूर्ण रक्कम ही चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवाल सादर केल्यानंतर 15 दिवसांच्या आत शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांच्या कार्यालयाने प्रदान करावी.